PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Saadhi Manas
Year: 1965

Song: Maalyachya Malyamandi
Lyricist: Yogesh

माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं

दादाच्या मळयामंदी
मोटंचं मोठं पाणी
पाजीते रान सारं
मायेची वयनी
दादाच्या मळयामंदी
मोटंचं मोठं पाणी
पाजीते रान सारं
मायेची वयनी
हसत डुलत मोत्याचं पीक येतं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं
सावळा बंधूराया
साजिरी वयनी बाई
सावळा बंधूराया
साजिरी वयनी बाई
गोजिरी शिरपा हौसा
माहेरी माज्या हाई
वाटंनं माहेराच्या धावत मन जातं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं

राबतो भाऊराया
मातीचं झालं सोनं
नजर काढू कशी
जीवाचं लिंब लोनं
राबतो भाऊराया
मातीचं झालं सोनं
नजर काढू कशी
जीवाचं लिंब लोनं
मायेला पूर येतो
पारुचं मन गातं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं
गुलाब जाई जुई
मोगरा फुलवीतं
माळयाच्या मळयामंदी
पाटाचं पाणी जातं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*